# प्रकरण पहिले

## प्रवासवर्णन : स्वरूप-विकास

## प्रकरण पहिले

## प्रवासवर्णन : स्वरूप - विकास

ललित गद्याच्या विकासाचा एक नवा रस्ता म्हणजे प्रवासवर्णन प्रवासवर्णन प्रवासवर्णनासंबंधी गंगाधर गाडगीळ म्हणतात " प्रवासवर्णन हे मुख्यत: एका व्यक्तीने प्रवासात पाहिलेल्या किंवा अनुभवलेल्या गोष्टीचे वर्णन असते " [१] प्रवासवर्णन हे प्रवास, प्रदेश व प्रवासी या घटकानी मिळून बनत असते. त्यात प्रवासी हा महत्त्वाचा घटक असतो. प्रवास वर्णनात तो प्रवास कुणी केला यालाही महत्त्व असते. आपण पाहिलेला प्रदेश, तेथील निसर्ग व माणसे यांच्या सहवासात आलेला जीवनविषयक अनुभव व त्याचे दर्शन प्रवास वर्णनात असते. प्रवास वर्णन म्हणजे केवळ प्रवासाचे वेळापत्रक नव्हे की एखाद्या प्रदेशाची भौगोलिक माहिती नव्हे. तो कुणी केला याच बरोबर कोणत्या प्रदेशाचा केला यालाही प्रवास वर्णनात महत्त्व असते. या विचारासंबंधी र.ग. पंडित म्हणतात, " श्रीमंत , गरीब, भिकारी, साधुसंत, अध्यापक , धर्मोपदेशक, व्यापारी, सरदार यानी एकाच भूभागाचा प्रवास केला तर त्या प्रत्येकाचा त्या प्रवासातील दृष्टीकोण वेगवेगळा असतो." [२] त्या प्रत्येकाच्या दृष्टिकोणातून त्या प्रदेशाचे चित्र वेगवेगळे जाणवते. प्रत्यक्ष प्रवासकर्त्याला आलेल्या अनुभवांच्या जोरावरच प्रवासवर्णन लिहावे लागते. या मतासंबंधी गंगाधर गाडगीळ म्हणतात " प्रत्यक्ष घडलेल्या अगर अस्तित्वात असलेल्या

गोष्टींच्या व्दारे ते लिहिलेले असते " [3] प्रवासवर्णनातील प्रवासकर्त्याचे हेतू निरनिराळे असतात यासंबंधी पु.ल. देशपांडे आपल्या पूर्वरंगमध्ये म्हणतात " मी पूर्वेची वारी केली ती जीवनाच्या वाटा निरनिराळ्या नादात चालणा-या देशोदेशीच्या अनोळखी वारक-यांना भेटावे" [4] म्हणून म्हणजे प्रवासकर्त्या प्रत्येकाचा हेतू वेगवेगळा असतो व त्यासाठी तो प्रवास होत असतो.

हा प्रवास एका विशिष्ट अशा प्रदेशाचा असतो. प्रवासवर्णनातून जाणवणारा प्रदेश, तेथील माणसे, निसर्ग भूगोल इतिहास, संस्कृती, राजकारण, सामाजिक जीवन इत्यादीतून जाणवत असतो या संदर्भात अनंत काणेकराचे मत विचारात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात " देश म्हणजे ती विशिष्ट भूमी, ती झाडे, ती पुच्छे , ते वातावरण आणि ती झाडे आपला जीवनरस ज्या जमिनीतून शोषून घेतात, तसेच आम्ही माणसे देश या शब्दातून आमचा जीवनरस शोषून घेतो व आम्ही जे आहोत ते आम्ही होतो" [5] व्यक्तिसापेक्ष असणा-या या वाङ्‌मयप्रकारात जीवनानुभूतीचा व लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा उत्कट अविष्कार घडत असतो. अशा या प्रवासवर्णनातून प्रवासी लेखक वगळला तर त्या लेखनाला प्रवासवर्णन म्हणता येणार नाही. प्रवासात केंद्रिभूत मानून प्रवासी व प्रदेश यांचे कलात्मक समतोल दर्शन घडवावे लागते. त्यात व्यक्त होणारा " मी " हा कलात्मक दृष्टीने व्यक्त व्हावा लागतो. प्रवासवर्णनात "मी" ला अधिक महत्त्व असते. प्रवास-चित्रणात्मक लेखन हे स्वभावत: प्रथम पुरूषी असते. या लेखनात " मी " ला टाळणे जवळ जवळ अशक्य असते. या प्रवासामधून प्रवासकर्त्यांच्या आवडी निवडी, छंद, सहज लक्षात येतात. केवळ प्रवास या घटकतत्वामुळे स्थाल वर्णन व इतर वाङ्‌मय प्रकाराहून ते वेगळे ठरते.

प्रवासर्णनात व्यक्त होणारा प्रदेश म्हणजे केवळ स्थल नव्हे, तर त्या प्रदेशातील समाजाची एक विशिष्ट देशी संस्कृतीही असते. प्रभाकर पाध्ये यानी " तोकोनामा " या प्रवासवर्णनामध्ये जपान मधील गृहरचनेचे दर्शन घडविले आहे,

म्हणजे प्रवासवर्णनामधील प्रदेश हा भौगोलिक वैशिष्ट्यांनी व संस्कृतीने युक्त असा असतो. प्रवासवर्णनात त्या स्थळाचे एक प्रकारचे व्यक्तिमत्त्व प्रकट होत असते. यासंबंधी रा.भी. जोशी म्हणतात , " स्थळाचे व्यक्तिमत्त्व अनेक घटकांतून व्यक्त होत असते. निसर्गाने त्या स्थाळाची केलेली रचना त्याचा खडबडीतपणा, रूक्षपणा, भव्यपणा, कोतेपणा, रेखीवता, रमणीयता, इत्यादी त्याला व्यक्तिमत्त्व प्राप्त करून देत असतात. तेच स्थल आपली काही वैशिष्टये घेऊन जिवंत होऊन राहते व त्यातून प्रवासवर्णनाला जिवंतपणा येतो " [६] त्या प्रदेशाचे वर्णन करताना लेखकाचे मन जर कलावंताच्या भूमिकेतून व्यक्त झाले तरच प्रवासवर्णनाला वेगळा अर्थ प्राप्त होतो. प्रवासवर्णन म्हणजे नोंद नव्हे तर ती अनुभवांची नवनिर्मिती असते. लेखकाच्या अनुभवातून तो प्रदेश जिवंत होत असतो. याबाबत वा.ल. कुलकर्णी म्हणतात " प्रवासवर्णन ही अनुभवांची नवनिर्मिती असते" [७] अनंत काणेकरांचे " धुक्यातून लाल ताऱ्याकडे हे अनुभवांच्या नवनिर्मितीमुळे जिवंत वाटू लागते. रा.भी. जोशी यांच्या मताप्रमाणे " प्रवासवर्णन ही एक गूढ प्रक्रिया आहे. प्रवास प्रदेश व प्रवासी यांच्या एकजीव होण्यातून ते आकार घेत असते." [८]

## जुन्या काळातील प्रवासविषयक भूमिका -

प्रवासकरणे ही मानवी जीवनाची मूलभूतप्रेरणा आहे. या संदर्भात काका कालेलकर म्हणतात "मानवी जीवनाची संचरणशीलता प्रवास करण्यासाठी उपयोगी पडते " [९] जुन्या काळातील प्रवास अनेक हेतूंनी केला जात होता. ग्रीस देशातील लोकाबरोबर हिंदू लोकांचा व्यापार सुमारे १२०० वर्षे सुरू होता. भारतीय व्यापारी मध्य अशियापर्यन्त आपले उंटाचे तांडे घेऊन प्रवास करीत असत. उद्योग , व्यापार ,नोकरी, रोजगार, अर्थार्जन ,तीर्थाटन करण्यासाठी लोक प्रवास करीत असत, विव्दान ब्राम्हण व साधुसंत यानी कारणापरत्वे देशभर संचार केला पण या सर्वांनीच आपल्या प्रवासाचा वृत्तांत लिहून ठेवलेला नाही.

प्रवासातील व्यक्तींच्या स्वभावाचे दर्शन -

प्रवासात भेटणाऱ्या विविध व्यक्तींच्या स्वभावाचे चित्रण प्रवासवर्णनामधून होत असते. मनुष्य स्वभावाच्या चित्रणामुळे त्याला जिवंतपणा प्राप्त होतो. प्रवासवर्णनामधील जीवनानुभूती प्रवासवर्णनाला खास अर्थ प्राप्त करून देत असतात. या अर्थपूर्णतिमुळेच प्रवासवर्णन हे इतर वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळे वाटू लागते. उदा. पु.ल.देशपांडे यांच्या " अपूर्वाई " तील माणसांच्या चित्रणामुळे प्रवासवर्णन जिवंत वाटू लागते. ही स्वभावचित्रणे प्रवासवर्णनाशी एकरूप होत असतात. या स्वभावचित्रणामुळे तो प्रदेश कांही वैशिष्ट्यांनी स्मरणात राहतो. प्रवासवर्णनांत हा वेगळा वाङ्मयप्रकार ठरण्यासाठी मनुष्यस्वभावाचे लेखकाच्या दृष्टिकोणातून केलेले वर्णन महत्त्वाचे ठरते. या विचारासंबंधी वा.ल. कुलकर्णी यांचे मत विचारात ध्यावे लागते " प्रवास चित्रणात्मक लेखनात जर विशेष जिवंतपणा कशाने येत असेल तर तो त्यातून अगदी सहजगत्या घडणाऱ्या मनुष्य स्वभावाच्या विविध दर्शनामुळे ". [१०]

काव्यात्मकतेचा प्रत्यय -

प्रवासवर्णनास जेव्हा प्रतिमेचा स्पर्श होतो तेव्हा ती नुसतीच प्रवासाची हकीकत न राहता प्रवासवर्णनपर वाङ्मय असे स्वरूप त्याला प्राप्त होते. प्रतिभाशक्तीच्या वापरामुळे तो त्या प्रदेशाचे प्राण उचलून त्याचे दर्शन घडवीत असतो. उदा. उध्वस्त विजयनगरचे अवशेष पाहताना प्रा. गगांधर गाडगोळांमधील कवीचे दर्शन घडते " या प्रवासातील अनुभवांना स्वत:ची एक वेगळी चव असते आणि ही वेगळी चव हेच या सर्व लेखनाला एकत्र जोडणारे सूत्र आहे." [११]

प्रवासवर्णनाचा विकास -

ललित गद्याचा विकासाचा एक नवा रस्ता म्हणजे प्रवासवर्णने एकेकाळी प्रवासवर्णने वस्तुनिष्ठ होती . नारी बह्माळियेच्या त्रिदिपूर वर्णनापासून मराठी प्रवासवर्णने मिळतात. नामदेवादिकानी तीर्थयात्रेच्या निमीत्ताने केलेली तीर्थावळी, पानपताहून परतलेल्या माणसांनी केलेली आत्मपर लिखाण हे आपले एतद्विषयक

पूर्वसंचित, इंग्रजी अमदानीत प्रवासवर्णने म्हणजे पुष्कळदा माहितीपर ग्रंथ असत.

मराठीतील प्रवासवर्णनांच्या परंपरेत वरसईकर गोडसे भटजींनी लिहिलेल्या " माझा प्रवास अथवा १८५७ च्या बंडाची हकीकत " ह्या १८८२ ,८३ मध्ये लिहिलेल्या पण १९०७ मध्ये चिंतामणराव वैद्यांनी संपादित करून प्रसिध्द केलेल्या प्रवासवर्णनाचा उल्लेख महत्त्वाचा आहे. गोडसे भटजींच्या या प्रवासवर्णना नंतर १९०५ पर्यन्तच्या काळापर्यन्त महत्त्वपूर्ण असे प्रवासवर्णनात्मक लेखन झाले नाही. जे झाले ते निव्वळ माहितीवजा, रूक्ष हकीकतीचे आहे.

१९५० नंतर प्रवासवर्णनात्मक लेखनातून स्थल-प्रदेशाचे महत्त्व कमी होऊन स्थल व प्रदेश पाहणारा जो कुणी "मी " आहे त्यालाही महत्त्व आले. निरनिराळ्या प्रदेशात हिंडणा-या "मी त्वा " च्या महत्त्वाबरोबर ललित निबंधातील निमित्तमात्र असणा-या विषयवस्तु ला ही प्रवासवर्णनात महत्त्व आले, त्यामुळे प्रवासवर्णनाचे अतरंग व बहिरंग पालटत गेले.

तीर्थयात्रांच्या निमित्ताने झालेल्या काही लालित्यपूर्ण लेखनामध्ये काकासाहेब कालेलकरांना अग्रक्रम द्यावा लागतो. हिमालयाचा प्रवास, लोकमाता, आमच्या देशाचे दर्शन, लाटांचे तांडव, भक्ति कुसुमे इ. पुस्तके त्यांच्या अभिजात रसिकतेची, निसर्ग प्रेमी सौंदर्यनिष्ठ आणि उदात्ततेचा मागोवा घेणा-या मनाची, ध्येयवादाची साक्ष देतात. महादेवशास्त्री जोशी ( तीर्थरूप महाराष्ट्र ), कुंदर दिवाण ( हिमालयाची हाक ), यांच्या प्रवासवर्णनातूनही आकर्षक भाषा-शैली व जिज्ञासू परंतु भाविक वृत्तीचे दर्शन घडते.

पाहिलेल्या दृश्यांची किंवा केलेल्या प्रवासाची केवळ जंत्री देण्यापेक्षा लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा अविष्कार होताना, ती अधिक लालित्यपूर्ण होताना अलिकडची प्रवासवर्णने दिसतात, याचे प्रमुख श्रेय अनंत काणेकर ( धुक्यातून लाल ता-याकडे , आमची माती आमचे आकाश, निळे डोंगर तांबडी माती, खडक कोरतात आकाश ) यांच्याकडे जाते. काणेकरानंतर प्रवासवर्णनात्मक स्फुट लेखन

रसिक व साक्षेपीवृत्तीने रा.भी.जोशी ( वाटचाल, मजल, दरमजल ) यानी केले आहे. त्यानंतर साहजिकच गंगाधर गाडगीळ ( गोपूरांच्या प्रदेशात , साता समुद्रापलीकडे ) व प्रभाकर पाध्ये ( अगस्तीच्या अंगणात, तोकोनामा ) यांची नावे समोर येतात. भारत आणि युरोप अशियातील प्रवासात आलेले अनुभाव त्यांच्या समृध्द व्यक्तिमत्वातून अभिव्यक्त होतात.

बाळ गाडगीळ ( सिगरेट आणि वसंतऋतू ) जयवंत दळवी ( लोक आणि लौकिक ) सौ. कमला फडके ( उटकमंडची यात्रा ) ,डॉ. वसंत अवसरे ( लाल नदी निळे डोंगर ) , चारूशीला गुप्ते ( बर्फाच्या दुनियेत ) यांच्याबरोबरच प्र.न. जोशी, अरविंद गोखले , ग.त्र्य.माडखोलकर, सौ. यमुनाबाई शेवडे, सौ. ज्योत्स्ना भोळे, दा.भ, कर्णिक, वि.स. वाळिंबे इ. च्या प्रवासवर्णनात्मक पुस्तकांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. प्रवासवर्णनात्मक अशा ललित गद्यवाङ्मयात दि.बा. मोकाशींच्या " पालखी " चा उल्लेख करावा लागेल. प्रवासवर्णनात्मक स्फुट स्वरूपाचे लेखन करणा-यात पु.ल. देशपांडे ( पूर्वरंग अपूर्वाई ) हे एक सध्याच्या पीढीतील महत्वपूर्ण नाव आहे.या भ्रमंतीतून त्यांची कलासक्त, रसिकदृष्टी जागोजागी प्रत्ययाला येते.

सध्या सांस्कृतिक देवाण घेवाणीच्या शासकीय दृष्टिकोणामुळे मोठया प्रमाणात सर्व प्रकारच्या व सर्वस्थरातील लोकांना परदेशपर्यटनाची संधी उपलब्ध होत आहे. शिवाय हौसे-पोटीही परदेशपर्यटनाची वृत्ती वाढत असल्याने आज नित्यनेमाने प्रवासवर्णनात्मक स्फुट लेखनात भर पडतच आहे.

प्रकरण पहिले

१) गंगाधर गाडगीळ - " साहित्याचे मानदंड ",
पॉप्युलर प्रकाशन मुंबई -३४,
प.आ. १९६३, पृ.क्र. १७४.

२) र.ग. पंडित - " हिंदुस्थानातील आमच्या ठिकठिकाणच्या सफरी",
सपा.बा.द्रु. देशपांडे, भोर,
प.आ. १९०९, पृ.क्र. १८.

३) गंगाधर गाडगीळ - " पूर्वोक्त ( उनो ), पृ.क्र. १७४.

४) पु.ल.देशपांडे - " पूर्वरंग,
देशमुख आणि कंपनी, पुणे-२,
द्रु.आ. १९७०, पृ.क्र. ३४७ .

५) अनंत काणेकर - " धुक्यातून लाल ताऱ्याकडे "
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४, प.आ. १९६७,
पृ.क्र. १९४, १९५.

६) रा.भी.जोशी - " मजल दरमजल",
मौज प्रकाशन, मुंबई-४, प.आ. १९६१,
पृ.क्र. ११.

७) वा. ल.कुलकर्णी - " वाङ्मयातील वादस्थळे "(वाटचाल प्रस्तावना)
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-३४, द्रु.आ. १९६२,
पृ.क्र. २.

८) रा.भी.जोशी - " पूर्वोक्त ( उनो), पृ.क्र.४.

९)	काका कालेलकर	-" जीवनलीला,"
अनु. रमेश मंत्री,
पॉप्युलर बुक डेपो, मुंबई-७,
प.आ. १९५८,
पृ.क्र. ४६.

१०)	वा.ल. कुलकर्णी	-" पूर्वोक्त ( उनी ),
पृ.क्र. ११.

११)	गंगाधर गाडगीळ	-" सातासमुद्रापलीकडे",
सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे-२,
दु.आ. १९६४,
पृ.क्र. ३३९.